**वादी क्र.२ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ९ तर्फे विधीज्ञ श्री.एस. व्ही. शिवणे यांच्यामार्फत**

**१३.** माझ्या आजोबांचे नाव खंडु बैकरे होते. त्यांना तिन मुले होते. त्यांची नावे श्रीरंग, बापूशा व नरहरी अशी होती. प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत गट नं.२४९ मधील आहे. त्याचे संपूर्ण क्षेत्र १२ एकर २७ गुंठे आहे. त्याचा जुना सर्वे नं.२८ होता. मी गट नं.२४९ चा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.१ ते ९ व्यतिरीक्त इतर लोकांची नावे ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.१ ते ९ व्यतिरीक्त इतर १४ लोकांची नावे आहेत. ते १४ लोक कुठे आहेत, ते जिवंत आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती आहे. ते नावे अवघड असल्याने मी सांगू शकत नाही. नावे असलेल्यांपैकी रियासत बानू, नबाब साब हे मयत आहेत. जिवंत लोकांची पत्ते मला माहिती नाही. मला एक आई आहे. माझ्या वडीलांचे दोन लग्न झाले होते किंवा कसे ते मला माहित नाही. माझ्या वडीलांच्या पहिल्या पत्नीचे नाव सावित्रा श्रीहरी बैकरे होते किंवा कसे ते मला माहित नाही. सावित्रापासून माझ्या वडीलांना वंदना नावाची एक मुलगी आहे किंवा कसे ते मला माहित नाही. वंदनाचे सासर सुकणी येथील आहे किंवा कसे ते मला माहित नाही. माझे वडील मयत झाल्यानंतर आम्ही वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला होता. वंदनाला हिस्सा मिळू नये यासाठी तिचे नाव वारसा प्रमाणपत्रामध्ये घेतलेले नाही किंवा कसे ते मला माहित नाही. वंदनाला आम्ही या दाव्यात पक्षकार केलेले नाही.

**१४.** मला गट नं.२४९ मधील १२ एकर २७ गुंठ्याच्या चतुःसिमा सांगता येतात. पुर्वेस–कोंडीबा पन्हाळे यांचे शेत आहे, पश्चिमेकडे–बालाजी बैकरे, उत्तम बैकरे यांची जमिन व श्रीहरी बैकरे यांची जमिन आहे, दक्षिणेकडे – गुंडण पन्हाळे यांची जमिन व उत्तरेकडे– सरवर देशमुख यांची जमिन आहे. हे म्हणणे खरे नाही की, उत्तरेकडे फक्त मुनवर देशमुख याची जमिन आहे, सरवर देशमुख यांची नाही. गट नं.२३५ मध्ये माझे वडील, प्रतिवादी क्र.१ व बालाजी बैकरे यांनी ७ एकर १२ गुंठे क्षेत्र खरेदी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या क्षेत्राबाबत दावा क्र.५१६/२०१९ आमच्या व प्रतिवादी क्र.१ मध्ये प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते सामाईकरित्या खरेदी केलेले क्षेत्र सामाईकमध्ये विक्री केलेले आहे. त्या ७ एकर १२ गुंठ्यापैकी विक्री करून आमच्या कुटुंबाची एकूण किती जमिन शिल्लक आहे ते मला

माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २०.०४.२०१४ रोजी मी प्रतिवादीविरूध्द जळकोट पोलीस स्टेशनमध्ये अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये दिनांक ०९.०६.२०१४ रोजी पोलीसांनी माझा जबाब घेतला होता व त्यानुसार आरोपीविरूध्द गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत आरसीसी १४९/२०१४ ही केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी प्रतिवादीविरूध्द खोटे गुन्हे दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, २३५ मधील उर्वरित क्षेत्र माझेच आहे असे म्हणून मी प्रतिवादी विरूध्द खोट्या केसेस केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.२४९ मधील जमिनीवर कसलाही हक्क नसताना मी माझ्या वडीलांना प्रस्तुतचा दावा द्यायला भाग पाडले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१० ते १३ यांचा दावा जमिनीशी कसलाही संबंध नसताना आम्ही त्यांना पक्षकार केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचा त्या जमिनीशी संबंध नसल्याने ते प्रस्तुत दाव्यात हजर झालेले नाहीत.

**१५.** माझे वडील दोन ते तिन वर्षापूर्वी अर्धांगवायू होऊन आजारी पडले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वडीलांचे बनावट सर्वाधिकारपत्र दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्वाधिकार पत्र डेबुक नं.२९२/२०२२ अन्वये माझ्या वडीलांनी माझ्या हक्कात केवळ दि.दा.क्र.५१६/२०१९ या दाव्यासाठी सर्वाधिकारपत्र दिले होते. आता मला यादी निशाणी ६७ वरील नोंदणीकृत सर्वाधिकारपत्र दाखवण्यात आले. उलटतपासात संदर्भीत झाल्याने त्यास **निशाणी क्र.९६** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये प्रस्तुत प्रकरणाचा क्रमांक पेन दिलेला आहे. मी बनावट कागदपत्र तयार केल्याबाबत प्रतिवादी क्र.१ ने माझ्याविरूध्द फौजदारी कारवाई केली आहे किंवा कसे ते मला आठवत नाही.

**(प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरून पुढील उलटतपास तहकुब)**

श्रृवणोत्तर स्वीकृत समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.11.04 14:54:59 +0530

( **स्वानंदी दे. वडगांवकर**)

दिनांक – ०४.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,अहमदपूर.